बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 10 वा | बुधवार, दि. 1 ते 7 जानेवारी 2025 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किंमत 2 रु |
BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | issue 10 | tuesday, 1 To 7 Jan 2025 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs. 2 रु |

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
# गदर
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855




# पोलीस आकाच्या गर्दनीपर्यंत पोहोचल्याने घाबरून सरेंडर झाला : आमदार सुरेश धस यांचा हल्लाबोल

## 14 दिवसाची पोलिस कोठडी ; देशमुख हत्याकांडातील आरोपींना सोडणार नाही : मुख्यमंत्री

बीड प्रतिनीधी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यतत्परतेमुळे पोलीस वाल्मीक कराडच्या आकाच्या गर्दनीपर्यंत पोहोचली होती आणि म्हणून घाबरून तो सरेंडर झाला अशी प्रतिक्रिया भाजप आमदार सुरेश धस यांनी  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी त्यांनी संवाद साधला. आका आणि कंपनीने परळीमध्ये अनेक खून पचवले. दहा-पंधरा खून पचले. त्यामुळेच त्यांची हिंमत झाली फरार व्हायला, पण संतोष देशमुख यांचा खून आम्ही पचू देणार नाही, असा इशारा धस यांनी दिला. परळीतील वाळू माफियांचे रॅकेट हेसुद्धा आकांचेच आहे. आकांचाच भाऊ त्यात आहे. दाऊदपूर आणि आसपासच्या परिसरातून उचललेल्या राखेचे सर्वेक्षण करून ते सर्व बोझे आकाच्या या गुंडांच्या सातबारावर टाकावेत अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे ते म्हणाले. हा आका कोण, असे विचारले असता त्या आकाचे नाव चौकशीत समोर येईल. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा की नाही, हा अजितदादा यांचा प्रश्न असल्याचे धस म्हणाले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या अनुषंगाने वाल्मीक कराड, सुदर्शन घुलेसह चार फरार आरोपींच्या शोधासाठी सीआयडीची नऊ पथके आणि 150 पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले आहेत. देशभर शोध सुरू असल्याचा दावा केला जात आहे. परंतु 22 दिवस उलटूनही हे आरोपी सापडलेले नाहीत. सरपंच हत्या प्रकरणात सुदर्शन घुले यांच्यासह तिघेजण फरार आहेत. तर दोन कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात वाल्मीक कराड मोकाट होता. त्याच्या शोधासाठी सीआयडीचे पथक धावपळ करत होते. मात्र, कराड सापडला नाही. अखेर मंगळवारी सकाळी कराड हा स्वतः पोलिसांना शरण आला.

## आज मस्साजोगमध्ये सामूहिक जलसमाधी आंदोलन

■ संतोप देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार असलेल्या मारेकऱ्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी मस्साजोग ग्रामस्थ आज दि. १ जानेवारी रोजी सामूहिक जलसमाधी आंदोलन करणार आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपीसह तीन आरोपी अजुनही मोकाट आहेत. त्यांना अटक करण्याची मागणी आता लावून धरण्यात आली आहे. मस्साजोग ग्रामस्थांनी सामूहिक जलसमाधी आंदोलना संदर्भात केज तहसिलदारांना निवेदनही दिले आहे.

## जरांगे पाटलांनी घेतली देशमुख कुटुंबियांना भेट

■ वाल्मिक कराड यांची शरणागती होत असतानाच मनोज जरांगे पाटील हे मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख कुटुंबियांना भेटले आहेत. यावेळी त्यांनी देशमुख कुटुंबियांनी न्याय देण्यासाठी शेवटपर्यंत लढू असे अश्वासन दिले. कोणी या प्रकरणात दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर राज्यभरात आंदोलनं करू, असे देखील मनोज जरांगे पाटील यावेळी म्हणाले.

## धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा आमदार संदीप क्षीरसागर

■ तो जर यात दोषी नाहीतर पहिल्या दिवशीपासून का फरार झाले ? जो पर्यंत हा गंभीर विषय महाराष्ट्राच्या समोर आला तेव्हा मास्टरमाईंचे नाव घेऊन बोललो. त्यानंतर एसपींची बदली झाली. मुख्यमंत्र्यांना याच विषयावर बोलायला आलो आहे. कराड केवळ खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी आहेत त्यांना खुनाच्या गुन्ह्यात घ्यावे, अशी मागणी मी मुख्यमंत्र्यांना केली आहे. मुख्यमंत्र्यांनी मला सांगितले की ज्यांची सीडीआरमध्ये नावे आहेत त्यांच्यावर कारवाई होईल. हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून ते निकाली काढा. तोपर्यंत धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी माझी मागणी आहे. या प्रकरणात राजकारण असण्याचे कारण नाही. सर्वपक्षाच्या आमदारांनी यात आवाज उठवलेला आहे, असेही आ. संदीप क्षीरसागर म्हणाले.

## अखेर वाल्मीक कराड अखेर पोलिसांना शरण


■ बीड ल्हियातील मस्साजोग गावचे संरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्या प्रकरण तसेच पवनचक्की खंडणी प्रकरणी फरार वाल्मीक कराड मंगळवारी सकाळी पोलिसांना शरण आला. पाषाण येथील सीआयडीच्या कार्यालयात त्याने आत्मसमर्पण केले. मागील काही दिवसांपासून सीआयडीची 13 वेगवेगळी पथके त्याच्या मागावर होती. संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी फासावर लटकेपर्यंत पोलिस स्वस्थ बसणार नाहीत, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. बीडच्या प्रकरणात आम्ही कुणालाही सोडणार नाही. या प्रकरणात ज्याचा संबंध ज्या प्रकरणात आढळेल त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. आम्ही गुंडांचे राज्य चालवू देणार नाही नसल्याच त्यांनी सांगीतले.

## देशमुख हत्या प्रकरणातील म्होरक्या कराडवर मोक्का लावा: संभाजीराजे

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडने पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे. यावर छत्रपती संभाजीराजे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांना भेट घेतल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी लगेच निर्णय होतो. याच्या मागे काही लपले आहे, हा संशोधनाचा भाग आहे. मुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की शरण आला म्हणजे गुन्हा संपत नाही. १४ गुन्हे असूनही बॉडी गार्ड घेऊन फिरतो. या सगळ्या आरोपींना मोक्का लावणार असे तुम्ही म्हणाला होता, त्यावर मोक्का लावा. खंडणीच्या गुन्ह्यात नोंद केली आणि नंतर बेल घेऊन बाहेर पडणार हा खेळखंडोबा आम्ही सहन करणार नाहीत. तुम्ही मोका कसे लावणार, खुनाचा गुन्हा कसा लावणार यावर मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे. धनंजय मुंडे यांना पालकमंत्री करू नये. हे बीडमध्ये कोणालाही जाऊन विचारले की वाल्मीक कराड कोण आहे, सगळे सांगतील हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सात जणांचा म्होरक्या आहे. आणि या म्होरक्यावर कोणाचा आशीर्वाद आहे तर धनंजय मुंडेचा आहे. शरण आला म्हणजे संपले असे नाही, आता खरी जबाबदारी सरकारची वाढली आहे. असेही संभाजीराजे म्हणाले.







## वाल्मीक कराडला सहआरोपी करा देशमुख कुटुंब उच्च न्यायालयात

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येनंतर पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करून नवनीत काँवत यांची नियुक्ती करण्यात आली. २६ तारखेला सीआयडीने तपास हाती घेतला. या सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर संतोष देशमुख कुटुंबियांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात धाव घेऊन खंडणीच्या गुन्हयात असलेल्या वाल्मीक कराडला सहआरोपी करा, अशी मागणी देशमुख कुटुंबीय यांनी केली आहे.

## तपास नि:पक्षपाती व्हावी ही अपेक्षा : आमदार प्रकाश सोळंके

तब्बल २२ दिवसांनंतर वाल्मिक कराड हा पुण्यातील सीआयडीच्या कार्यालयात शरण आला. याविषयी आमदार प्रकाश दादा सोळंके म्हणाले की, वाल्मिक कराडने शरणागती पत्करली, हे खरंतर सीआयडीचे अपयश आहे. सीआयडी वाल्मिक कराडला पकडू शकली नाही, कराड यांनी आत्मसमर्पण केलं. परंतु, अजूनही खुनाच्या गुन्ह्यातील तीन प्रमुख आरोपी मोकाट आहेत. त्यांना आतापर्यंत अटक झालेली नाही. वाल्मिक कराड इतके दिवस कुठे होते ? पोलिसांपासून ते अशा पद्धतीने लपून कसे राहू शकले ? याचाही तपास सीआयडीने करावा. वाल्मिक कराड शरण आले नसते तर सीआयडीने अजूनही त्यांना किती दिवस पकडले नसते हा देखील चर्चेचा मुद्दा आहे. इथून पुढे तपास नि:पक्षपातीपणे व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## उज्वल निकम यांची नियुक्ती करा

संतोष देशमुखला ज्या लोकांनी मारले ते सगळे ज्या दिवशी फासावर लटकतील त्याच दिवशी खऱ्या अर्थाने आम्हाला या प्रकरणात न्याय मिळेल. प्रासोबत आ. प्रकाश सोळंके, आ. संदीप क्षीरसागर यांनी देखील या प्रकरणात आवाज उठवला आहे. संतोषला निर्दयीपणाने मारल्यानंतर हा मुद्दा मी सभागृहात मांडला. त्यानंतर सगळा महाराष्ट्राचा मीडिया इकडे वळला. या प्रकरणात उज्वल निकम यांनी बाजू मांडावी, अशा प्रकारची विनंती मी मुख्यमंत्र्यांना करणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचा महाराष्ट्राला आदरयुक्त धाक आहे. सरकारने नेमलेल्या आयजींच्या नेतृत्वाखाली सीआयडी काम करत आहे. त्यांच्या तपासावर मी समाधानी आहे. आता लवकरात लवकर उरलेले आरोपींना अटक करावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे.




जाहीरात व बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड
# गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लगे मो. 9763521855





## युवा उद्योजक तथा संचालक रणजित धस यांचा सत्कार संपन्न

**वडवणी प्रतिनीधी :**

वडवणी येथील साई आशिर्वाद ट्रेडर्सचे मालक तथा बाजार समितीचे युवा संचालक रणजितभैय्या मधुकरराव धस यांनी नुकतीचा थायलंड या देशाचा दौरा करून तेथील पर्यटन स्थळाला भेटी देत मायदेशीत परतले असल्याने त्यांचा बाजार समिती व रॉयल ग्रुपच्या वतीने सत्कार करत शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

रणजितभैय्या धस यांची दि. १६ ते २१ डिसेंबर या दरम्यान ब्रिटिश पेंट कंपनीच्या वतीने परदेशी दौयासाठी फुकेट थायलंडला निवड - झाली होती. तेथील पर्यटन स्थळाला भेटी देत ते मायदेशी परतले आहेत. सदरील दौरा पुर्ण करून आल्यानंतर जन्मभूमि असणाया वडवणी येथील महाराणी ताराबाई विद्यालय, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सभापती संभाजी शिंदे, उपसभापती अनिल चोले, मार्केट कमिटी सचिव गोविंद आंधळे, ज्येष्ठ संचालक पांडुरंग अंडील, डॉ. खोटे, संचालक भिकाराम साळवे व सर्व संचालकानी हार, शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. तर द रॉयल ग्रुप च्या वतीने कल्याणराव राऊत, घुले काका, अरुण मुंडे, गोरख राठोड, डोंगरे सर, देवानंद तांबडे व सर्व मित्र परिवाराच्या वतीने रणजितभैय्या धस यांचा सत्कार केला तर रणजित धस यांनी देखील सर्वाचे आभार मानले आहेत.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा व्यापक उपक्रम

**वडवणी प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड येथे २९ डिसेंबर ते २६ जानेवारी पर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ पिंपरखेड गाव आणि परिसरातील वाचक प्रेमींनी घ्यावा असे आवाहन या ग्रंथालयाचे सचिव प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी केले आहे. या वाचनालयात दिनांक २९ रोजी वाचनालय स्वच्छता राबविण्यात आली. ३० डिसेंबर ते १५ जानेवारी ग्रंथ प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये १ जानेवारी रोजी विद्यार्थी /विद्यार्थिनी सामूहिक पुस्तक वाचन, विद्यार्थी वाचन संवाद, १६ जानेवारी रोजी पुस्तक परीक्षण /कथाकथन, २६ जानेवारी रोजी विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. अशा महत्त्वपूर्ण उपक्रमाचं आयोजन करण्यात आलेलं आहे. तरी गावातील वाचक प्रेमी विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक वर्ग महिला वर्ग यांनी सदरील वाचनालयातील उपक्रमाचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे. आवाहन वाचनालयाच्या अध्यक्ष विशाखा खळगे, उपाध्यक्ष ॲड. दादासाहेब तांगडे, सचिव प्रकाश खळगे सर, ग्रंथपाल पल्लवी खळगे, सहाय्यक ग्रंथपाल सौ. शीलाताई सुखदेव उजगरे, सहकार्य श्रीमती अग्नि अण्णाभाऊ खळगे, उदय निवृत्ती खरात सर, शीतल खळगे ,आनंद खळगे यांनी केले.




## रंजना भावसार जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने सन्मानित

**वडवणी प्रतिनिधी**

नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महाराष्ट्र राज्य महिला परिषदेच्या राज्य सचिव रंजना भावसार यांना वर्षे 2024 साठी जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन फेडरेशन २ चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्रात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन चे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन च्या वतीने राज्य भर विविध उपक्रम राबविले जातात या मध्ये रक्तदान शिबीर ,मुल दत्तक घेणे,वृक्ष लागवड ,गरजुना ताडपत्री वाटप , कॅन्सर पेशंट साठी उपचार , जयपूर फुट्स,सामुहिक विवाह सोहळा , गरीब विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत आदिंचा समावेश आहे .

या फेडरेशन चे नुकतचे संभाजीनगर येथे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले या अधिवेशनात नाशिक येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा अखिल भारतीय भावसार क्षत्रिय महासभा महिला परिषदेच्या महाराष्ट्र राज्य सचिव रंजना भावसार यांचे या वर्षातील अत्यंत प्रशंसनीय कार्य झाले असल्याने त्यांना फेडरेशन अध्यक्ष प्रशांत मालानी यांच्या हस्ते तर संभाजीनगरच्या उप जिल्हाधिकारी अंजली धानोरकर, स्पेशल कमिटी मेंबर सुर्यमाला मालानी , विनोद शेवतेकर,संजय गुगळे, सचिव पल्लवी जोशी नाशिक प्राईड चे सचिव अनिरुद्ध जाजु आदि मान्यवरांच्या उपस्थितीत तर पास्ट प्रेसिडेंट राजेंद्र चव्हाण,नरेश गुप्ता, डॉ गुरुदत्त राजपूत, डॉ संजय नाफाडे, रत्नाकर महाजन यांच्या विशेष उपस्थितीत स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करत हा पुरस्कार देण्यात आला. संभाजीनगर येथे झालेल्या त्या वर्षे 2023च्या जायंट्स ग्रुप ऑफ नाशिक स्टार या ग्रुप च्या अध्यक्ष पण भुषविले आहे. रंजना भावसार यांचे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान आहे. रंजना भावसार यांना जायंट्स वेल्फेअर फाउंडेशन, फेडरेशन दोन चा उत्कृष्ट युनिट डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मित्र, मैत्रीण, नातेवाईक, समाज बांधव तसेच सर्व स्तरातून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## दिगंबरराव देशमुख यांचे वृध्दापकाळाने निधन

**वडवणी प्रतिनिधी :** वडवणी तालुक्यातील येथील वेदशास्त्र संपन्न सेवानिवृत्त शिक्षक दिगंबरराव मल्हारराव देशमुख यांचे दि.२५ डिसेंबर २०२४ बुधवार रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांचे वय १०० वर्ष होते. दिगंबरराव मल्हारराव देशमुख हे जुन्या काळातील जिल्हा परिषदेचे शिक्षक होते. तत्वनिष्ठ व आदर्श शिक्षक म्हणून त्यांनी पुर्ण हयातीत भुमिका निभावली. तसेच ते वेदांमध्येही पारंगत होते. त्यांचे दि.२५ डिसेंबर २०२४ बुधवार रोजी वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर पिंपरखेड येथे अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कार प्रसंगी वडवणी व पिंपरखेडसह परिसरातील ग्रामस्थ, व्यापारी, राजकीय पुढारी, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात कुटुंबात दोन मुले आणि तीन मुली, जावाई, सुना व नातवंड असा परिवार असून देशमुख परिवारावर कोसळलेल्या दु:खात परिवार सहभागी आहे.

# किसान कृषी महोत्सवाचे अयोजन

## शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा कृषिभूषण महेश बेदरे यांचे आवाहन

### खा.पाटील ,मठाधिपती शिवाजी महाराज, जरांगे पाटलाच्या हस्ते होणार उद्घाटन तर पुरस्कार वितरणासं, छत्रपती संभाजी,खा.सोनवणे, धसाची उपस्थिती उपस्थिती

**गेवराई (प्रतिनिधी)**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या 16 वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक 03 ते 07 जानेवारी दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड रोड वरील आठ एकर विस्तारणीय दसरा मैदानात भव्य अशा 5 दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आसल्याची माहिती आयोजन समितीचे मुख्य संयोजक महेश बेदरे, स्वागताध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कार्याध्यक्ष भाऊसाहेब शिंदे , पुरस्कार समिती प्रमुख राजेंद्र आतकरे मुख्य संयोजक महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेश बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे.



कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. दि 3 जानेवारी शुक्रवार रोजी दुपारी 12:00 वा. राज्य सभेच्या खासदार रजनीताई अशोकराव पाटील, मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून श्री क्षेत्र नारायण गडाचे मठाधिपती शिवाजी महाराज, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी चे कुलगुरू डॉ ईद्रमणी यांची विशेष उपस्थिती असणार , प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादीचे नेते राजेसाहेब देशमुख, केज माजी नगर उपाध्यक्ष आदित्य दादा पाटील, गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे,पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर , तालुका कृषी अधिकारी वडकुते, आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर दि 4 रोजी विविध तज्ज्ञांची चर्चासत्र होणार आहे दि. 6 जानेवारी रविवार रोजी दुपारी 2.30 वाजता कृषिरत्न पुरस्कार वितरण सोहळा व भव्य शेतकरी मेळावा होणार आहे युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खा. बजरंग सोनवणे हे असणार आहेत या शेतकरी मेळाव्याला प्रमुख उपस्थिती आ.




सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर, श्रीरामपूरच्या आ. हेमंत ओगले, रिसोड चे आ. अमित झनक, डॉ धनंजय जाधव, आप्पासाहेब कुढेकर, यांची उपस्थिती लाभणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून हे उपस्थित राहणार आहेत दि. 5 जानेवारी रोजी एकदिवसीय पशुप्रदर्शन 7 जानेवारी रोजी समारोप सोहळा होणार आहे. या तर विविध शेती विषयावर चर्चासित्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार असून वरील सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, स्वागताध्यक्ष भाऊसाहेब नाटकर ,निमंत्रक शिनु भाऊ बेद्रे , कार्याध्यक्ष भाउसाहेब शिंदे ,स्वागत समिती प्रमुख , मान्यवर स्वागत समिती प्रमुख, राजेंद्र बेदरे, नियोजन समिती प्रमुख राजेंद्र मोटे , व्यवस्थापन समिती प्रमुख राजाराम पवार , प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ , चर्चासत्र समितीप्रमुख सतीश केसभट, पशुप्रदर्शन समिती प्रमुख संभाजी जाधव आदींनी केले आहे.

नगर पंचायत वडवणी जि बीड

**जाहिरनामा**

दि.३१/१२/२०२४ फा.क्र.८८/२०२४

अर्जदाराच नाव **१) श्री. सर्जेराव भगवान उजगरे**
विक्री किंवा नावे करुन देणा-याच नाव १)श्री. भगवान मसाजी उजगरे
**प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्व नं./गट क्र. प्लॉट नं. मिळकत क्र. २२३ व २५८ वडवणी येथील आहे. सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.
**आकारः** १) लांबी पुर्व-पश्चिम ००.०० फुट व रुंदी दक्षिणोत्तर ००.०० फुट एकुण क्षे. पी.टी.आर. प्रमाणे

**पुर्व :** पी.टी.आर. प्रमाणे
**पश्चिम:** पी.टी.आर. प्रमाणे
**दक्षिण :** पी.टी.आर. प्रमाणे
**उत्तर :** पी.टी.आर. प्रमाणे

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

नगर पंचायत, वडवणी जि बीड

**जाहिरनामा**

फा.क्र.८७/२०२४ दि.३१/१२/२०२४

अर्जदाराचे नाव १) **श्री. आबासाहेब खेमा राठोड**
**विक्री किंवा नावे करून देणा-याचे नाव १) श्री. प्रकाश आप्पाराव क्षीरसागर**
**प्रकरणः** नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५४० प्लॉट नं. मिळकत क्र. २३४८ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे.ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
**आकार :** १) लांबी पुर्व-पश्चिम ४० फुट व रुंदी दक्षिणोत्तर २५.०० फुट एकुण क्षे.९२.९३ चौ.मी.

**पुर्व :** रस्ता
**पश्चिम:** विक्रेता
**दक्षिण :** सुनिता आडे यांची जागा
**उत्तर :** विक्रेता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

नगर पंचायत वडवणी जि बीड

**जाहिरनामा**

फा.क्र.८६/२०२४ दि. ३१/१२/२०२४

**अर्जदाराचे नाव १) श्री. जालींदर दगडु चव्हाण**
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १)श्री. गोरख रामराव चव्हाण
**प्रकरण** : नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.६५५ प्लॉट नं.४२ मिळकत क्र. ४८३२ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.
आकार: १) रुंदी पुर्व-पश्चिम १०.२० मी व लांबी दक्षिणोत्तर १२.२० मी. एकुण क्षे. १२४.४४ चौ.मी.

पुर्व : प्लॉट नं. 43
पश्चिम : प्लॉट नं. 41
दक्षिण : 30 फुट रस्ता
उत्तर : प्लॉट नं. 37

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

नगर पंचायत, वडवणी जि बीड

**जाहिरनामा**

फा. क्र.८५/२०२४ दि.३१/१२/२०२४

**अर्जदाराचे नाव १) श्री. अंकुश नामदेव म्हेत्रे** विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. फिरोज इब्राहीम शेख २) हारुन इब्राहीम शेख प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र. प्लॉट नं. मिळकत क्र.८०९ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा /वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.
आकार: १) रुंदी पुर्व-पश्चिम २५.०० फुट व लांबी दक्षिणोत्तर ५०.०० फुट त्यापैकी नं. १ देणार फिरोज शेख रुंदी पुर्व-पश्चिम १२.५० फुट व लांबी दक्षिणोत्तर ५०.०० फुट एकुण क्षे. ५८.०० चौ.मी. नं. २ हारुन शेख

पुर्व : हारुन चाऊस
पश्चिम : खरेदीदार
दक्षिण : रस्ता
उत्तर : सिराज रशीद कुरेशी

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, वडवणी**

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड गादर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855



बुधवार, दि. 1 ते 7
जानेवारी 2025

# श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील गोशाळेत गोपूजनसह नवीन शेडचा लोकार्पण सोहळा संपन्न



## श्री शनिप्रसाद गो शाळेला निधी कमी पडू देणार नाही : आ.विजयसिंह पंडित

**गेवराई प्रतिनिधि**

श्री क्षेत्र राक्षसभुवन सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वारकरी परंपरा जोपासावी आणि बहारावी यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे तिर्थराज महाराज पठाडे यांनी सुरु केलेल्या श्री शनि प्रसाद गोशाळेचे गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेतून काम सुरु आहे. या कामी आपलाही खारीचा वाटा राहिल तसेच भविष्यात शनिप्रसाद गो शाळेसाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी यावेळी बोलताना दिले.

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथील श्री शनी प्रसाद गोशाळेत गोमाता पूजन व नवीन गोशाळेच्या शेडचा लोकार्पण सोहळा सोमवार दि.३० डिसेंबर रोजी संपन्न झाला. यावेळी श्री क्षेत्र मच्छिंद्रगड संस्थानचे मठाधिपती श्री. ह.भ.प. जनार्दन महाराज

यांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले तर आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न झाला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जय भवानी सहकार साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्यासह वारकरी संप्रदायातील संत महंतांसह राक्षसभुवन आणि पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. पुढे बोलताना आ. पंडित म्हणाले की मी जोपर्यंत आमदार आहे तोपर्यंत श्री शनि प्रसाद गोशाळेला कसलाही प्रकारचा निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन त्यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना दिले. तर श्री शनिप्रसाद गोशाळेचे संस्थापक श्री ह भ प तीर्थराज महाराज पठाडे यांनी गोमातेचे विशेष महत्त्व सांगून प्रत्येकाने गोमातेचा सांभाळ करावा असा मौलिक सल्लाही यावेळी दिला. यावेळी लोकार्पण सोहळ्यास भाऊसाहेब शिंदे, राजेंद्र डाके, तात्या नाटकर, काकासाहेब नाटकर, प्रदीप काळम, पांडुरंग डाके, कल्याण पठाडे, शांतीलाल वाव्हाळ, अशोक जैन, अशोक नाटकर, संदीप नाटकर, डॉ. अमोल नाटकर, बापूसाहेब घमाट सह आदी गोभक्त उपस्थित होते. कार्यक्र माचे प्रस्ताविक ज्ञानेश्वरी सेवक गणेश महाराज बोचरे यांनी तर उपस्थितांचे आभार गोशाळचे सचिव एकनाथ महाराज पठाडे यांनी व्यक्त केले.

# चिंचोटी येथे जयसिंग भैया सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**वडवणी प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माजलगाव मतदार संघाचे युवा नेतृत्व जयसिंह भैया सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त जयसिंग भैया युवा मंच चिंचोटी यांच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सविस्तर वृर्त असे की बीड जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम मा सभापती जयसिहं भैय्या सोळुंके यांचा वाढदिवस जयसिंह भैय्या युवा मंच चिंचोटी यांच्या वतीने प्रत्येक वर्षी कसल्याही प्रकारे व्यर्थ खर्च न करता सामाजिक उपक्रमाने साजरा केला जातो यामध्ये ऊसतोड मजुरांना ब्लँकेटचे वाटप,जिल्हा परिषद प्राथमीक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य वाटप केले जाते.

या वर्षी ही सोमवार दि ३० डिसेंबर रोजी जिल्हा परीषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना रजिस्टर पेन पेन्सिल खोडरबर शॉपनर अदी शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेते राजानंद गोंडे महादेव गोंडे यादव गोंडे आसाराम गोंडे,आशोक गोंडे,दादासाहेब गोंडे पत्रकार रामेश्वर गोंडे, मुकुंद गोंडे, भागवत गोंडे नवनाथ गोंडे,कृष्णा गोंडे अक्षय गोंडे मसुराम गोंडे,उत्रेश्वर गोंडे मुख्याध्यापक नांदे सर यांच्या सह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी विशेष परीश्रम कृष्णा गोंडे व उत्तरेश्वर गोंडे यांनी घेतले.



# महाराष्ट्राज्य अखिल भारतीय परतूर पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

**राणी लक्ष्मीबाई अहिल्याबाई होळकर नवनिर्वाचित अध्यक्षपदी शामसुंदर चित्तोडा,सचिवपदी प्रभाकर प्रधान तर उपाध्यक्षपदी गणेश लालझरे याची निवडI**







**परतूर प्रतिनीधी**

महाराष्ट्र राज्य अखिल भारतीय परतूर पत्रकार संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यामध्ये अध्यक्ष म्हणून शामसुंदर चित्तोडा यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर सचिव पदी प्रभाकर प्रधान तर उपाध्यक्ष म्हणून गणेश लालझरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

दरम्यान, रविवारी (दि.२९) शहरातील शासकीय विश्रामगृहात ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार भारुका यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी निवडी बाबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ही निवड करण्यात आली तर उर्वरित कार्यकारणी कोषाध्यक्ष पांडुरंग शेजुळ,सह कोषाध्यक्ष इम्रान कुरेशी सह सचिव कैलाश चव्हाण यांची प्रमुखनिवड करण्यात आली. तर कायदेविषयक सल्लागार ऍड.सुरेश काळे सल्लागार पदी शिवकुमार भारुका,शेषराव वायाळ,सुनील शिवणगिरी, रशीद बागवान,योगेश बरीदे,सय्यद वाजेद, सुरेश कवडे,संजय देशमाने,शेख अथर,हनुमंत दवडे, सुधाकर जाधव,कैलास सोळंके,प्रा. गणेश शिंदे,संतोष आखाडे याची निवड करण्यात आली.

यावेळी, संतोष शर्मा,कुलदीप बिनगे,सागर काजळे,शेख असेफ,रवी भद्रगे,पवन राशनकर, राहुल मुजमुले,आदींची यावेळी उपस्थिती होती. दरम्यान,यावेळी नवनिर्माण कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.

# महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचे काम तीन दिवस बंद

## सरपंच परिषद आक्रमक : मस्साजोगप्रकरणी २ जानेवारीपर्यंत टाळे

**सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले, प्रदेश प्रवक्ते अँड राज पाटील यांचे आवाहन**

**बीड प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र राज्य आक्रमक झाली असून दि. ३१ डिसेंबर ते २ जानेवारीदरम्यान राज्यातील ग्रामपंचायतींचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सातारा येथे जिल्ह्यातील आणि मुंबईतील आझाद मैदानावर राज्यातील सरपंचांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आलेला आहे. या बंदमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन सरपंच परिषद पुणे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले व प्रदेश प्रवक्ते एडवोकेट राज पाटील यांनी केले आहे.

सातारा येथे चार दिवसांपूर्वी मस्साजोगप्रकरणी सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून रास्ता रोकोही केला होता. त्यावेळी या सरपंच परिषदेच्या वतीने पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले होते. बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची पवनचक्कीच्या प्रकरणातून खंडणीखोरांनी निघृणपणे हत्या केली. या घटनेला अनेक दिवस होऊन गेले तरीही सर्व आरोपींना अटक झालेली



नाही. तसेच त्यांची हत्या

करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास लवकर होत नसल्याच्या निषेधार्थ राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज हे ३१ डिसेंबरपासून तीन दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच सातारा येथे आणि मुंबईतही सरपंचांच्यावतीने आंदोलन करण्यात येणार आहे. या

### बीड जिल्ह्यातील सरपंचांनी पुढाकार घ्यावा

मसाजोग येथील सरपंचाचा झालेला खून माणूसकीला काळीमा फासणारा आहे. सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्याची जिम्मेदारी बीड जिल्ह्यातील सरपंचांची सुद्धा आहे. त्यामुळे सर्व जोपर्यंत संतोष देशमुख यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत या लढ्यात सहभागी व्हावी या लढ्यात पुढाकार घ्यावा असे आवाहन सरपंच परिषदेचे प्रदेश प्रवक्ते एडवोकेट राज पाटील यांनी केले आहे.

प्रकरणात पोलिसांनाही सहआरोपी करावे. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता आरोपींना अटक करावी. तसेच या हत्येचा तपास जलदगतीने व्हावा. गुन्ह्यातील मास्टरमाइंडवरही खुनाचा गुन्हा दाखल करावा. यापुढे अशा घटना होऊ नयेत म्हणून आमदार, खासदार या लोकप्रतिनिधी प्रमाणेच सरपंचांनाही संरक्षण कायदा लागू करावा, तपास पूर्ण होत नाही तोपर्यंत देशमुख कुटुंबीयांना पोलिस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. त्यानंतर आता सरपंच परिषद पुणे महाराष्ट्र राज्याच्यावतीनेही आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे.

# साळींबा येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**नामांकित कीर्तनकाराचे होणार कीर्तन**
**पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा ग्रामस्थांचे आवाहन**

**वडवणी/प्रतिनिधी :**

प्रती वर्षीप्रमाणे याहीवर्षी ह.भ.प. पंढरीनाथ महाराज वारकरी यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरीनाम सप्ताहास काल वार मंगलवार रोजी प्रारंभ झाला असुन यामध्ये सात दिवस संत जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा सह नामवंत कीर्तनकार यांचे किर्तन होणारं आहेत तरी सप्ताहातील सर्वच धार्मिक कार्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन साळींबा ग्रामस्थांचा वतीने करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह साळींबा येथे होत असून याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज व वारकरी संप्रदायाच्या सकल साधु संताच्या कृपा आशीर्वादाने वै.ह.भ.प. रामभाऊ महाराज लबडे (वारकरी पंढरपुर) यांच्या मार्गदर्शनाखाली गाथा पारायण : श्री. ह.भ.प. दामु आण्णा गोंडे वारकरी यांच्या नेतूवाखाली संपन्न होत आहे. या सप्ताहात पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा, हरिपाठ, रात्री कीर्तन व नंतर हरीजागर अशा विवीध कार्यक्रमाची रेलचेल आहे. यामध्ये ह.भ.प. उत्तरेश्वर महाराज पुरभें,ह.भ.प. विष्णुपंत महाराज लोंढे,ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली बादाडे,

ह.भ.प. भगवान म. राजपुत (श्री क्षेत्र राजा हरिशचंद्र संस्थान, मठाधिपती),ह.भ.प. विष्णु महाराज जगताप (गीता मंदिर अध्यक्ष, पैठण,ह.भ.प. विष्णु महाराज गोंडे वेदांताचार्य,ह.भ.प. राजाराम महाराज सुर्यवंशी रामायणाचार्थ



तसेच ह.भ.प. बन्सी महाराज उबाळे अध्यक्ष, गिता मंदिर पंढरपुर यांचे काल्याचे किर्तन होणार आहेत. या सप्ताहात सात दिवस मोठया प्रमाणावर अन्नदान होणार आहे.

त्याच प्रमाणे हरिजागर केसापुरी परभनी, लक्ष्मीपुर, कान्हापूर,मोरेवाडी, पिंपरखेड,बाहेगव्हाण, मामला,सोन्ना,धर्मापुरी,चिंचोटी येथील भजनी मंडळींचा जागर होणार आहे. या सप्ताहात मोठमोठे गायक, वादक, वारकरी यांची उपस्थिती आहे. तरी या संपुर्ण सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे ग्रामस्थांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने शालेय साहित्य वाटप

**जालना : प्रतिनिधी**

आजचा विद्यार्थी उदाचा देशाचा कणा आहे. जेवढे या शालेय शिक्षणात विद्यार्थी मन लावून अभ्यास करतील तेवढ्याच जास्त क्षमतेने त्यांचा विकास होत असतो. त्यांना क्षिक्षणात अधिक अधिक गोडी निर्माण व्हावी या उदांत हेतूने -अनु.आदिवासी कनिष्ठ महाविद्यालय पाडळी,तालुका परतुर येथे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



यावेळी संस्थांनचे प्रमुख उपस्थिती जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संप्रदाय जालना जिल्हा अध्यक्ष नवनाथ पवार साहेब, जिल्हा महिला अध्यक्ष सौ वर्षाताई तोटे, जिल्हा कर्नल मधुकर पवार साहेब,जिल्हा लेफ्टनंट कर्नल सुदाम पोटे साहेब,परतुर तालुका अध्यक्ष महादेव काळे साहेब, परतुर तालुका महिला अध्यक्ष राहीताई घरडे, जालना तालुका सामाजिक उपक्रम प्रमुख सुनील तोटे सर,परतुर तालुका ब्लड कॅम्प प्रमुख शत्रुघन, प्रदीप गारकर, तसेच भक्त शिष्य शाळेतील सर्व विद्यार्थी शाळेतील सर्व शिक्षक याप्रसंगीउपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक यांनी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानच्या उपक्रमाबद्दल संस्थांनचे आभार मानले.

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड
# गादर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855

## दाढी-कटिंगसाठीचे 20 टक्क्याने दर वाढविण्याचा नाभिक समाज बांधवांचा निर्णय; आज पासून नवीन दर लागू

### महागाई वाढल्यामुळे दरवाढीचा निर्णय : किशोर गाडेकर, सुनील दोडके

**बीड प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई लक्षात घेऊन नाभिक समाज बांधवांनी दाढी आणि कटिंगच्या दरामध्ये 20 टक्क्याने वाढ करण्याचा निर्णय नाभिक समाज बांधवांच्या व व्यवसायिकांची हॉटेल नीलकमल येथे दि. 28 डिसेंबर 2024 रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत घेतला आहे. ही नवीन दरवाढ आजपासून म्हणजेच 01 जानेवारी 2025 या नवीन वर्षापासून लागू करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले आहे. मागील काही दिवसापासून जीवनावश्यक वस्तू सह विविध वस्तूंच्या भावत दिवसेंदिवस वाढ होत आहे. या वाढत्या महागाईचा मोठा फटका सामान्य नागरिकांसह नाभिक व्यवसाय करणाऱ्या समाज बांधवांना होत आहे. त्यातच जीएसटी, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, सलून उपयोगी वस्तूंच्या दरात होणारी वाढ, वाढते. वीज बिल, वाढत चाललेले कर्जाचे हप्ते या सर्व आर्थिक विवेंचनात सलून कारागीर अडकला आहे. एकंदरीत या सर्व बाबींचा विचार करता नाभिक समाज बांधव आणि सलून व्यवसायिकांना मोठा फटका बसत आहे. त्याच बरोबर अनेक अडिअडचणींचा आणि संकटांचा सामना नाभिक समाज बांधव व सलून व्यवसायिकांना करावा लागत आहे. आजच्या स्थितीत कित्येक व्यवसायिकांना आपला उदरनिर्वाह करण्याचा खर्च भागविणे अवघड होत चाललेले आहे. घरखर्च मुलांचे शिक्षण त्याचबरोबर वृद्ध आई-वडिलांचा आजारपणाचा खर्च या सर्व बाबींचा खर्च भागविता भागविता नाभिक समाज बांधव सलून व्यावसायिक हैराण झाले आहेत. शिवाय दर पाच वर्षाला नाभिक व्यवसाय समाज बांधव दाढी व कटिंगच्या दरात केवळ 20 टक्के दरवाढ करत असतात. कोरोना महामारीच्या आधी म्हणजेच 2019 मध्ये 20 टक्के दरवाढ केली होती. त्यानंतर अद्याप भाव वाढ केलेली नाही. वाढती महागाई आणि पाच वर्षानंतर होणारी दरवाढ लक्षात घेऊन येत्या 2025 या नवीन वर्षामध्ये दरवाढ करण्यासंदर्भात बीड शहरातील नाभिक समाज बांधव व व्यावसायिक बांधवांनी 28 डिसेंबर रोजी बीड शहरातील नीलकमल हॉटेलमध्ये नाभिक समाज बांधवांची आणि सलून व्यवसायिकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत कटिंग आणि दाढीच्या दरामध्ये 20 टक्क्याने भाव वाढ करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. शिवाय यावेळी नवीन दरवाढीचे फलक प्रत्येकाने आपल्या दुकानात लावावे असेही ठरविण्यात आले. आज 1 जानेवारी 2025 या नवीन वर्षापासून बीड शहरातील सर्व सलूनमधील हेअर कट, शेविंग त्याचबरोबर इतर सर्व सौंदर्य प्रसाधन कामावरती 20 टक्के दरवाढ करण्यात येणार आहे. याबाबत सलून व्यवसायिकांनी निर्णय घेतला आहे.

**महागाई वाढल्यामुळे दरवाढीचा निर्णय : किशोर गाडेकर, सुनील दोडके**

वाढत्या महागाईचा फटका सलून व्यवसायाला मोठा बसला आहे. नाभिक समाज बांधावर आर्थिक आपत्ती ओढावली. त्यामुळे अनेकांच्या दुकानाचे भाडे थकले. सरकारकडून कसलीही मदत मिळत नाही. कोरोना महामारी नंतरच्या काळात अनेक दुकानांची भाडेवाढ झाली. फेशिअल, ब्लेड, क्रीम यासारख्या साहित्याच्या दरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली. वीज बिल वाढले, त्यामुळे दाढी कटिंग च्या दरात 20 टक्के वाढ करण्याचा नाईलाजाने निर्णय घ्यावा लागला असल्याचे मत नाभिक समाज संघटनेचे किशोर गाडेकर आणि बीड शहराध्यक्ष सुनील दोडके यांनी सांगितले.





## आ.खोतकर, आ.कुचे यांचा बदनापूर येथे सत्कार

### शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे बदनापूर शिवसेनेच्यावतीने आयोजन

**बदनापूर, प्रतिनीधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे नवनिर्वाचित आ. अर्जुनराव खोतकर व बदनापूरचे आ.नारायण कुचे यांचा बदनापूर येथे नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी खोतकर यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधून गृहोपयोगी साहित्य तसेच कामगारांना सेफ्टी किटचे वाटप करण्यात आले.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे व बदनापूर शिवसेनेच्यावतीने आयोजित या कार्यक्रमास माजी आ. अरविंद चव्हाण, माजी .जि प अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, शिवसेना संपर्क नेते पंडितराव भुतेकर, युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर, हरिश्चंद्र शिंदे, अनिलराव कोलते, कैलास मदन, परमेश्वर नाईकवाडे, भगवान मात्रे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. खोतकर म्हणाले की, जालना आणि बदनापूर मतदारसंघातील प्रत्येक गावाला वॉटर ग्रीड फिल्टर योजने अंतर्गत जायकवाडी धरणाचे पाणी देण्यात येणार आहे. महत्त्वाच्या असलेल्या या सिंचन प्रकल्पासाठी माझ्यासह आ. कुचे हे प्रयत्न करणार आहे नदीजोड प्रकल्पासाठी आम्ही काम करणार असल्याची ग्वाही आ. अर्जुन खोतकर यांनी यावेळी बोलताना दिली. यावेळी माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी नारायण कुचे हे तिसऱ्यांदा विजयी होणार असल्याचे आपण सांगीतले होते. नारायण चव्हाण हे सुध्दा या मतदारसंघातून तीन वेळेस निवडून आले होते. नारायण कुचे सुद्धा हे सुध्दा हॅट्रीक करणार हे निवडणुकीच्या आधीच लक्षात आले होते. आ कुचे यांचं व्यक्तिमत्त्व चांगले असून त्यांचे कामही चांगले आहे. आगामी काळात मतदारसंघ खुला प्रवर्ग झाला तरी आ कुचे हेच बदनापूर मतदारसंघाचे आमदार असतील. आम्ही भाजपामधून बाहेर पडलो तरीसुद्धा आ. कुचे यांनी सातत्यानं मदत करण्याचे काम केल्याचे अरविंद चव्हाण यांनी सांगीतले. आ. नारायण कुचे यांनी महायुतीच्या सर्व मतदार, माता-भगिनी व लाडक्या बहिणीसह पदाधिकारी व कार्यकत्यांचे त्यांनी आभार मानले मतदाराच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही असेही आ. कुचे म्हणाले.

**शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी यावेळी बोलताना महायुतीमध्ये भाजप हा मोठा भाऊ असल्याचे सांगून राष्ट्रवादी आणि शिवसेना लहान भावाच्या भूमिकेत असल्यचे ते म्हणाले. त्यामुळे आम्हाला सत्तेचा वाटा आणि लाभ देण्यासाठी सहकार्य करावे, असे आ. कुचेंना उद्देशून ते म्हणाले.**

## माजलगावात उद्या ओंकार ज्वेलर्सचा भव्य उद्घाटन सोहळा

**माजलगाव प्रतिनीधी**

मागील अनेक वर्षांपासुन सराफा व्यापारात अग्रेसर असलेल्या येथील सोळंके कुटूंबीयांच्या ओंकार ज्वेलर्सचा भव्य उद्घाटन सोहळा उद्या दि. २ जानेवारी २०२५ रोजी होणार असुन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सोळंके कुटूंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

उद्घाटन सोहळ्यानिमीत्त दि. २ जानेवारीला सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांचे सुश्राव्य असे हरिकिर्तन होणार आहे. कीर्तनानंतर लगेच उद्घाटन सोहळा होणार असून अध्यक्षस्थांनी आमदार प्रकाश सोळंके हे तर आमदार संतोष बांगर हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. त्याचबरोबर माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,

**कीर्तनानंतर उद्घाटन**

मोहन जगताप, जयसिंग सोळंके, रमेश आडसकर, डॉ. प्रकाश आनंदगांवकर, बाबुराव पोटभरे, अशोक डक, राम कदम, माधव निर्मळ, सहाल चाउस, नितीन नाईकनवरे, विजय साळवे, सार्तिधर मैंद यांचेसह अनेकांची उपस्थिती असणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास असंख्य ग्राहक बंधु भगिनी व हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन ह.भ.प. तुकाराम नाना सोळंके, सुरेश सोळंके, दिलीप सोळंके, ओंकार सोळंके, अमोल सरोदे व समस्त सोळंके सरोदे परिवाराच्या वतीने करण्यात आले.



आज पंचायत समिती परतुर येथे ग्रामविकास अधिकारी यु. एस. नागरे यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याला बाजार समितीने सभापति शत्रुघ्न कणसे यांनी उपस्थित राहून त्यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करून त्यांना पुढील भावी वाटचाली करिता कणसे व लोणीकर परिवाराच्या वतीने व तालुक्यातील संपूर्ण सहकारी सरपंच यांच्यावतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष बंडूभाऊ मानवतकर गटविकास अधिकारी राजेश जी तांगडे ग्रामविकास अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डी.बि काळे साहेब तालुक्याचे अध्यक्ष श्री बाबाजी चव्हाण साहेब, व जिल्हा तालुक्याचे पदाधिकारी संपूर्ण ग्रामविकास अधिकारी सरपंच या कार्यक्रमासाठी उपस्थित होते...

## साहिबजादे यांचे शौर्य आदर्श लाखो युवकांना शक्ती देतात : संजय आंधळे

### साहिबजादे यांनी धर्म आणि धर्मनिरपेक्षतेसाठी जे बलिदान दिले ते अनमोलच- लक्ष्मण बहिरवाल
### महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालयात वीर बाल दिनानिमित्त केले अभिवादन

**वडवणी प्रतिनिधी**

मुघलांनी गुरुगोविंद सिंग यांच्या मुलांना कैद करून धर्म परिवर्तन करण्यासाठी जबरदस्ती केली होती मात्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांनी मुघलांना विरोध करत अवघ्या दोन्ही मुलांनी वयाच्या नऊ आणि सहाव्या वर्षी आपले बलिदान दिले आहे म्हणून 26 डिसेंबर हा वीर बाल दिन म्हणून त्यांचे शौर्य आणि इतिहास जगासमोर मांडला जात आहे गुरु गोबिंद सिंग यांच्या मुलांनी आपला धर्म आणि धर्मनिरपेक्षतेसाठी जे बलिदान दिले ते अनमोल असल्याचे मत युवा नेते संजय आंधळे यांनी महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालयातील वीर बाल दिनाच्या कार्यक्रमानिमित्त व्यक्त केले.



वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालयात 26 डिसेंबर वीर बाल दिना निमित्ताचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांच्या प्रतिमाला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी साहिबजादा जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांचा इतिहासातील छायाचित्रे फळ्यावर चिकटून विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. शौर्यगाथा मांडण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपाचे युवा नेते संजय आंधळे यांनी केले होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण बहिरवाल सर, ईश्वर तांबडे भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष, महादेव सावंत भाजपा तालुका उपाध्यक्ष, पत्रकार अविनाश मुजमुले, राहुल टकले, नामदेव पाटसकर, मुख्याध्यापक डी.डी राऊत सह आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून लक्ष्मण बहिरवाल सर यांनी सखोल असे मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना संजय आंधळे म्हणाले की, साहिबजादे जोरावर सिंग आणि साहिबजादा फतेह सिंग यांना 26 डिसेंबर या दिवशी हौतात्म्य प्राप्त झाले होते. म्हणून 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते त्याप्रमाणे वडवणीत पहिल्यांदाच वीर बाल दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.या दोन महात्म्यांनी धर्माच्या उदात्त तत्त्वांसाठी शत्रूंपुढं न झुकता आपले वयाच्या नऊ आणि सहा वर्षा च्या असतानाच बलिदान दिलं हे बलिदान आज ही लाखो युवकांना शौर्य आणि शक्ती देत असलेले चे मत त्यांनी व्यक्त केले यावेळी शिक्षक वृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सज्जावर न राहणाऱ्या तलाठी मंडळ, अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा

**माजलगाव (रिपोर्टर)**

तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी हे सज्जा वर न राहता घर भाडे उचलून शासनाची फसवणूक करत आहेत याशिवाय माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटून बेकायदेशीर वसुलीसाठी खाजगी व्यक्तीची नेमणूक करून जुगार अड्ड्या प्रमाणे अड्डे चालवत आहेत, ही बाब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी हे जाणीवपूर्वक दुर्लक्षित करीत असून

शासनाने वाटते खर्च करून प्रत्येक सज्ञाला बांधलेली तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालय हे जुगाराचे अड्डे अनं शोभेची वस्तू बनत चालले असून हजारो शेतक-यांना किरकोळ कामासाठी माजलगाव शहरातील गल्लीबोळात हिंडून चपला झिजवाव्या लागतात, तसेच खाजगी व्यक्ती करवी बेसुमार पैसे घेऊन शेतकऱ्याची लूट तलाठी मंडळ अधिकारी करत असताना वरिष्ठ अधिकारी तलाठी, मंडळ अधिकारी त्यांना पाठीशी घालत आहेत ही बाब निंदनीय असून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक शेतकरी कामगार पक्ष कदापिही सहन करणार नाही करिता शासना सह शेतक-यांची फसवणूक करणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अन्यथा १३ जानेवारी पासून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला असून निवेदनावर ॲड सय्यद याक्कुब, श्रीराम शेवाळे, राजेभाऊ घोडके, भाई साळूजी हांडे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## पाथरीत मंत्री बोर्डीकर,आ . राजेश विटेकरांचा नागरी सत्कार

### नागरी सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे माजी आ. हरिभाऊ लहाने हे राहणार आहेत


**पाथरी प्रतिनीधी**

येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर दि.१० जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महायुतीतील घटक पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व आ.राजेश विटेकर यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

सदर नागरी सत्कार सोहळा समितीची बैठक शनिवारी (दि. २८) येथील विश्रामगृह येथे झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भारतीय जनता पक्ष व शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघाच्या आ. मेघना बोर्डीकर यांच्या रूपाने अनेक कालावधीनंतर परभणीला मंत्रीपद मिळाले व आ. राजेश विटेकर हे पाथरी विधानसभा मतदारसंघातून भरघोस मताधिक्यानी विजयी झाल्याबद्दल तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना यांच्या महायुतीतील पदाधिकाऱ्यांच्या वतीने भव्य नागरी सत्कार सोहळयाचे आयोजन करण्याचे नियोजन झाले. दि.१० जानेवारी रोजी सेलू कॉर्नर ते साईबाबा मार्गावरून जिल्हा परिषद शाळा मैदानापर्यंत भव्य रॅली काढण्यात येणार आहे. नागरी सत्कार




सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे माजी आ. हरिभाऊ लहाने हे राहणार आहेत. सत्कार सोहळयाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार सोहळा समितीचे सर्वश्री अनिल नखाते, भावनाताई नखाते, दादासाहेब टेंगसे, संजय रनेर, डॉ. उमेश देशमुख, सुभाष आंबट, संजय कुलकर्णी, गोविंद गायकवाड, बाळासाहेब कोल्हे, गजानन धर्मे, पांडुरंग नखाते, विठ्ठल थोरात, अशोकराव शिंदे, सुशांत साळवे, कृष्णा गिराम, चंद हरकळ, भरत हरकळ, गणेश दुगाने, विजय कोल्हे यांनी केले आहे.






बेटी बचाओ
बेटी पढाओ

मुलींना बनविता येते कर्तृत्ववान
तिच्या कर्तृत्वाने वाढे आई बापांना मान

शिक्षणाची सधी मुलींना द्यावी
मुलींना कुटुंबाची ज्योती मानावी

मुलगी म्हणजे शिंपल्यातील मोती
तीच करते आयुष्यात प्रगती
स्त्री भ्रूणहत्या रोखण्याची समाजातील प्रत्येक घटकांची जबाबदारी असून, ती जबाबदारी पेलण्यासाठी आपण सर्वांनी सज्ज व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा रुग्णालय
बीड